## महत्त्वाचे

### नाशिक विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी लेखाविषयक प्रशिक्षण

**नाशिक ।** राज्य शासनाच्या सेवेतील नाशिक विभागातील लिपिक वर्गीय गट 'क कर्मचा-यांचे प्रशिक्षण विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक यांच्यामार्फत दि. ७ जुलै ते १८ सप्टेंबर (५० दिवस) या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयीन प्रमुखांना त्यांच्याकडील लिपिक वर्गीय कर्मचारी यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे आवाहन लेखा व कोषागारे, नाशिक विभागाचे प्र. सहसंचालक माधव थैल यांनी केले आहे. पन्नास दिवसांच्या या प्रशिक्षणामध्ये लेखा, वित्त व शासनाच्या विविध संगणक प्रणालींचा समावेश असून त्या विषयीचा निश्चित केलेला तपशिलवार अभ्यासक्रम कोषागार अधिकारी, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार यांच्या जिल्हा कोषागार कार्यालयात माहितीसाठी उपलब्ध आहे. या प्रशिक्षण सत्रासाठी कोणत्याही इच्छुक कर्मचायऱ्यांना प्रवेश देण्यात येईल. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा, शासन निर्णय दिनांक २४.०६.२०१५ नुसार सर्व शासकीय कर्मचारी व नवनियुक्त कर्मचारी यांना प्रशिक्षण सक्तीचे केले आहे. प्रशिक्षणासाठी संपूर्ण ५० दिवसांच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणे आवश्यक आहे. पूर्णवेळ पाठविणे शक्य नसल्यास विशिष्ट मोड्यूलसाठी प्रवेश घेण्याची अनुमती कर्मचारी यांना दिली जाईल, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

### राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेसाठी आवाहन

**नाशिक ।** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत संपूर्णपणे कला-साहित्य या क्षेत्राशी निगडित असलेल्या व त्यावर त्यांची उपजिविका अवलंबून आहे, अशा मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार यांना राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत प्रती महिना रूपये 5 हजार मानधन देण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी पात्र व्यक्तींनी आपले सरकार https://aaplesarkar.mahaonline.gov.in/en या पोर्टवर १ ते ३१ जुलै या कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हास्तरीय समिती सदस्य सचिव तथा जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा फडोळ यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. योजनेच्या लाभासाठी साहित्यिक किंवा कलावंत हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. लाभार्थ्यांचे वय ५० पेक्षा जास्त आहे. दिव्यांगांसाठी वयोमर्यादा ४० वर्षे अशी आहे. कला व साहित्य क्षेत्रात किमान 15 वर्षे योगदान हवे. साहित्य व कलाक्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व मोलाची भर घातलेल्या व्यक्ती, वयाने ज्येष्ठ असणारे, विधवा, परितक्त्या, दिव्यांग कलाकार यांना प्राधान्य आहे. कलाकाराचे सर्व मार्गानी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रूपये ६० हजार पेक्षा जास्त नसावे. ज्या कलाकरांची उपजिविका केवळ कलेवरच अवलंबून आहे तसेच जे कलाकार फक्त कलेवरच अवलंबून होते, मात्र सध्या त्यांना इतर कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही, असे कलाकार, केंद्र किंवा राज्य शासनाच्या महामंडळे व इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले कलाकार योजनेसाठी पात्र आहेत.

### ऑलिम्पिक दिन सप्ताहांतर्गत तलवारबाजी स्पर्धा संपन्न

**नाशिक ।** २३जून हा दिवस जागतिक ऑलिम्पिक दिवस म्हणून जगभरात साजरा केला



जातो. हा दिवस उत्साहात साजरा करण्याच्या हेतूने गेल्या १६ वर्षापासून नाशिक डिस्ट्रिक्ट मल्टी गेम्स असोसिएशन, कालिका मंदिर, यशवंत व्यायाम शाळां आणि विविध क्रीडा असोसिएशन यांच्या वतीने अनेक क्रीडा उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून दि. २३ जून रोजी सकाळी ८.३० वाजता क्रीडा रॅली संपन्न झाली. भारताचे महान हॉकीपटू ऑलिम्पिकम पदक विजेते पद्मश्री आणि अर्जुन पुरस्कारप्राप्त जफर इक्बाल यांचे हस्ते या रॅलीची सुरवात करण्यात आली. यावेळी नाशिक डिस्ट्रिक्ट ऑल गेम्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल देशमुख, हेमंत पांडे, दीपक पाटील, विंग कमांडर प्रदीप बागमार, अशोक दुधारे, आनंद खरे, अविनाश खैरनार, राजू शिंदे, शशांक वझे, आनंद चकोर नाशिकच्या जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, क्रीडा अधिकारी संदीप ढाकणे, सर्व खेळांचे प्रमुख याचबरोबर २१० खेळाडूंची उपस्थिती होती. या ऑलिम्पिक क्रीडा सप्ताहांतर्गत तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा कालिका मंदिर देवी ट्रस्टच्या हॉलमध्ये पार पडल्या. स्पर्धेचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष केशव पाटील यांच्या हस्ते, मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. १७ वर्षे वयोगटाच्या या स्पर्धेत ८३ मुले, ४६ मुलींनी सहभाग नोंदवला. ईपी, फॉईल व सॅबर या तीन प्रकारात स्पर्धा खेळविल्या गेल्या. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रीडा संघटक राजू शिंदे, आनंद चकोर आणि सहकारी यांनी परिश्रम घेतले.

# शहर, जिल्ह्यात राजश्री शाहू महाराजांची जयंती उत्साहात

**नाशिक ।** शहर व जिल्ह्यात राजश्री शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त सर्वत्र विविध उपक्रम राबविण्यात आले.

**ठाणगाव जनसेवा सेवाभावी संस्थेचा उपक्रम**

**सिन्नर ।** ठाणगाव जनसेवा सेवाभावी संस्थेच्यावतीने छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र



उपाध्यक्ष मुकुंद काकड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी राज्यश्री छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजा, अटल फाउंडेशन जिल्हाध्यक्ष व भारतीय जनता पार्टी सरचिटणीस तालुका रामदास भोर, ठाणगावचे उपसरपंच विलास मोरे, सामाजिक कार्यकर्ते के एल शिंदे, अजय शिंदे, भानुदास शिंदे, नितीन पाटोळे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनाविषयी रामदास भोर यांनी माहिती दिली. छत्रपती शाहू महाराजांनी गरीब, मागासवर्गीय आणि दलित लोकांसाठी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शिक्षणावर भर दिला आणि सर्वांना शिक्षण मिळावे यासाठी अनेक शाळा सुरू केल्या. ते पहिले राजे होते ज्यांनी मागासवर्गीयांना नोकरीत आरक्षण दिले. महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणेच छत्रपती शाहू महाराजांनीही, सामाजिक समितीसाठी काम केले. त्यांनी सत्यशोधक समाजाला मदत केली आणि प्रजेवर प्रेम करणारे होते, त्यांनी महिलांसाठीही शिक्षण आणि हक्क यावर भर दिले. त्यांच्या काळात कोल्हापूर हे एक प्रगत पाणी लोक भूमी संस्था झाली होती. छत्रपती शाहू महाराजांना आजही लोकांच्या मनावर राज्य करीत आहे. यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित जनसेवेचे कार्यकर्ते, सुदाम शिंदे, संतोष शिंदे,शुभम केदार, भरत भले, संजय काकड, एकनाथ धोंगडे, बजरंग कातोरे, दशरथ मेंगाळ, किरण भले, आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

**हरसूल महाविद्यालयात जयंती साजरी**

**हरसूल ।** येथील, महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित



कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोतीराम देशमुख यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने साजरी करण्यात आले. महाविद्यालयात प्राचार्य डॉ मोतीराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून स्वदेश फाऊंडेशनचे पदाधिकारी श्री खांडबहाले,श्री. बाळा माने हे होते. महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रम प्रसंगी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. मोतीराम देशमुख यांनी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक,शैक्षणिक ,राजकीय, कृषी कार्यास उजाळा दिला". या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे महाराष्ट्रातील एक प्रमुख समाजसुधारक होते. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन, अस्पृश्य समाजाच्या एकूणच सामाजिक,शैक्षणिक कृषी क्षेत्रातील उन्नतीसाठी शाहू महाराजांनी अथक प्रयत्न केल्यामुळे त्यांना लोककल्याणकारी राजा म्हणून ओळखतात. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने त्यांना 'राजर्षी' ही उपाधी दिली. शाहू महाराजांचा जन्मदिवस हा महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून साजरा केला जातो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.अजय अहिर यांनी केले.

याप्रसंगी, महाविद्यालयाच्या शैक्षणिक पर्यवेक्षक डॉ. मीनाक्षी पाटील, प्रा.कुणाल वाघ, प्रा. श्रीकृष्ण जाधव प्राध्यापक बंधु-भगिनी, कार्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्गही यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**राजर्षी शाहू महाराजांच्या देणगीचा मविप्रला भक्कम आधार : ॲड. नितीन ठाकरे**

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्था स्थापनेची आद्य प्रेरणा म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. संस्थेच्या सर्वप्रथम वसतिगृहाची पायाभरणी महाराजांच्या हस्ते झाली. सन १९२० मध्ये महाराजांच्या १५ हजार रुपयांच्या देणगीमुळे संस्थेला त्याकाळी भक्कम आधार मिळाला, असे प्रतिपादन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात लोककल्याणकारी राजा राजर्षी शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

यावेळी ठाकरे म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याने आणि विचारांनी प्रेरित होऊन सर्व कर्मवीरांनी या संस्थेची उभारणी केली. आज राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा चालविण्याचा आणि त्यांना अभिप्रेत असलेले काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही करीत आहोत. कार्यक्रमाप्रसंगी मविप्रचे शिक्षणाधिकारी प्रा. शशिकांत मोगल तसेच, मनीषा भामरे, उदाजी अर्ली इअर्सच्या मुख्याध्यापिका दीप्ती पटेल, संस्थेतील शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

**शाहू महाराज-सामाजिक भान जपणारे द्रष्टे विचारवंत : सुनील आगळे**

**नाशिकरोड ।** सामाजिक समानता आणि आधुनिक दृष्टी येण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असल्याचे राजर्षी शाहू महाराज यांनी ओळखले. त्यासाठी प्रत्यक्ष पायाभरणी करणारे शाहू महाराज हे सामाजिक भान




जपणारे द्रष्टे विचारवंत होते, असे प्रतिपादन पळसे येथील ग्रामाभिमान मंचचे सचिव प्रा.सुनील आगळे यांनी केले. पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांचा जन्मदिन म्हणजेच सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक अरुण पगार, महाराष्ट्र माझा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विकास (बंटी) भागवत, ग्रामाभिमान मंचचे खजिनदार समाधान गायधनी, सदस्य रवींद्र टिळे, राहुल फडोळ, ओमकार गायधनी, सोहम गायधनी मंचावर उपस्थित होते.

प्रा.आगळे पुढे म्हणाले की, कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी विविधांगी कार्य करत सर्वांसमोर आदर्श निर्माण केला. आपल्या वक्तृत्व आणि कर्तृत्वाने 'लोककल्याणकारी राजा' असे नाव अजरामर करणाऱ्या शाहू महाराजांचे कार्य आजच्या पिढीने आचरणात आणावे, असे आवाहन त्यांनी केले. विकास भागवत यांनी आपल्या भाषणात शाहू महाराजांसह महापुरुषांच्या जीवनकार्याची पुस्तकं प्रत्येकाच्या घरी असायला हवी. महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे विचार मांडले.

यावेळी विद्यार्थी आणि शिक्षक-कर्मचारी उपस्थित होते. ग्रामाभिमान मंचचे अध्यक्ष प्रमोद गायधनी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना स्कूलबॅगचे वाटप पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

# मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे कार्यक्रम

## विशाखा काव्य पुरस्काराचे ३० जूनला वितरण

**नाशिक ।** येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्यावतीने "विशाखा काव्य पुरस्कारा"चे येत्या सोमवारी (दि.३० जून) सायंकाळी चार वाजता विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण होणार असून, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन आणि कुलसचिव दिलीप भरड हे उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठातर्फे 'विशाखा काव्य पुरस्कार' प्रथमतःच प्रकाशित काव्यसंग्रहाला दिला जातो. द्विस्तरीय निवड पद्धतीने त्यासाठी तीन सर्वोत्तम काव्यसंग्रहाची निवड केली जाते. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी अनुक्रमे २१ हजार, १५ हजार व दहा हजार रुपयांचा धनादेश (दोन विजेते असल्यास धनराशी विभागून), प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यंदा सन २०२४ पर्यंतच्या राज्याच्या विविध भागातील एकूण २२ पुरस्कारार्थींना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कार विजेत्यांमध्ये सन २०१८ - प्रथम – तन्वी अमित (निष्पर्ण



फांदीवरचे पक्षी), द्वितीय – संतोष आळंजकर (मातीत हरवल्या कविता) व तृतीय – मोहन शिरसाठ (नाही फिरलो माघारी), सन २०१९ – प्रथम - विशाखा विशाखा (तुमुल अंतरीचे) व संदीप शिवाजीराव जगदाळे (असो आता चाड), द्वितीय - विनायक पवार (नामुष्कीचे पिढीजात वर्तमान) व अनिल साबळे (टाहोरा) आणि तृतीय – गजानन फुसे (दिवस बोलू देत नाहीत), सन २०२० – प्रथम - अक्षय शिंपी (बिनचेह-याचे कभिन्न तुकडे), द्वितीय - देवा झिंजाड (सगळं उलथून टाकलं पाहिजे) व तृतीय – नामदेव कोळी (काळोखाच्या कविता), सन २०२१ – प्रथम – तेजस मोदक (तृष्णाकर्ष), द्वितीय - रमजान मुल्ला (अस्वस्थ काळरात्रीचे दृष्टांत), तृतीय - मेघराज मेश्राम (माणूस असण्याच्या नोंदी) व स्व. विवेक काटीकर (दिक्काल धुकं पसरलेले सर्वत्र), सन २०२२ – प्रथम – सरिता सदाशिव पवार (राखायला हवी निजखुण), द्वितीय - प्रवीण अक्कानवरू (औटघटकेची युगांतरं), तृतीय - अमोल विनायकराव देशमुख (आठ फोडा आन बाहेर फेका), सन २०२३ – प्रथम - तान्हाजी रामदास बोऱ्हाडे (जळताना भुई पायतळी), सन २०२४ – प्रथम - सुनीता डागा (तुझं शहर हजारो मैलांवर), द्वितीय - सागर जाधव जोपुळकर (माती मागतेय पेनकिलर) व गौतम राजू ढोके (दंगल होतेच कशी?) यांचा समावेश आहे. सर्व रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनीकेले आहे.

# 'नशा मुक्त भारत' अभियानांतर्गत जनजागृती

## मविप्र परिचारिका महाविद्यालयाचा उपक्रम

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज परिचारिका शिक्षण संस्था आडगाव, नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २५) रोजी "नशा मुक्त भारत अभियान" अंतर्गत विविध जनजागृती उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.

समाजात व्यसनमुक्ती बाबत जागृती करण्यासाठी आडगाव परिसरात एक भव्य जनजागृती रॅली यावेळी काढण्यात आली , या रॅलीत विद्यार्थ्यांनी हातात घोषवाक्य लिहिलेली फलक आणि जनजागृतीचे संदेश देत व्यसनमुक्तीचा संदेश दिला. "व्यसनाला नाही म्हणूया", "स्वस्थ जीवनाचा स्वीकार करूया" यांसारखी घोषवाक्ये गजरात दिली गेली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्रांगणात पोस्टर




प्रदर्शन देखील आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम व समाजातील नकारात्मक प्रभाव यावर आधारित प्रभावी पोस्टर सादर केली. या प्रदर्शनाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व अभ्यागतांनी उदंड प्रतिसाद दिला. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या बी.एस्सी. नर्सिंग तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेतला. उपक्रमाचा प्राचार्या डॉ. पूर्णिमा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला तर एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी श्री. विनायक गुंजाळ, सह-समन्वयक गणेश चाकोर आणि भावेश बत्तिसे, वैष्णवी काबरी, सानिका बागूल, सार्थक गाडेकर यांनी आयोजनात विशेष भूमिका बजावली. या संपूर्ण उपक्रमामधूनफ विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी आणि आरोग्य विषयक जागरूकतेबाबत जबाबदारी स्वीकारली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने असे उपक्रम भविष्यातही नियमितपणे राबविण्याचा निर्धार करण्यात आला.

# भंडारदरा धरण ५०% भरले

## घाटघर परिसरात संततधार पाऊस

**अकोले ।** भंडारादरा धरण पाणलोट क्षेत्रात पावसा वेग वाढल्याने आज धरण ५० टक्के भरले आहे. निळवंडे धरणात पाणीसाठा जलद वाढण्यास मदत होत आहे. निळवंडे धरणाचा पाणीसाठा ४३ टक्क्यांवर पोहचला. पाऊस असाच सुरू राहीला तर ही दोन्ही धरण जुलै अखेर पूर्ण क्षमतेने भरतील, असा विश्वास आदिवासी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

मुळा नदीवरील अंबित १९१ दलघफूट सर्वप्रथम व तद्नंतर पिंपळगाव खांड प्रकल्प ६०० दलघफूट, कोथळे १८३ दलघफूट शिरपुंजे १५५ दलघफूट असलेले धरण ओव्हर फ्लो झाले. तर कृष्णावंती नदीवरील वाकी जलाशय १०२ दलघफूट व प्रवरा नदीला मिळणाऱ्या टिटवी शिवारातील ३०३ दलघफूट क्षमतेचे टिटवी लघुबंधारा पुर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाल्याने ओसंडून वाहत आहे. हे पाणी पुढे प्रवरेवरील निळवंडे धरणात येत असून या धरणात नवीन पाणीसाठा झपाट्यने वाढत आहे. गुरुवार सकाळी ६ वाजता भंडारदरा



धरणाचा पाणीसाठ ५४२१ दलघफूटवर झाला. गुरुवारी सकाळी ६ वाजता संपलेल्या २४ तासांत भंडारदऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस मिलिमीटरमधे असा आहे. कंसात या पावसाळ्यात झालेला एकूण पाऊस आहे.

घाटघर 89 रतनवाडी 101, भंडारदरा 75 पांजरे 78 सुमारे एक आठवड्यापासून घाटघर, रतनवाडी, साम्रद, पांजरे या भंडारदऱ्याच्या पाणलोट क्षेत्रातून मुसळधार पाऊस कोसळत असून शेतकऱ्यांचे भात आवणीस लवकरच वेग येणार आहे. धरण पाणीसाठामध्ये झपाट्याने वाढ असल्याने शाखा अभियंता प्रवीण भांगरे, वसंत भालेराव लक्ष ठेऊन आहे.

# अवैध दारू विक्रेत्यांना विरोधासाठी महिलांना दिले कायदेशीर बळ

## दिंडोरीचे पोलीस निरीक्षक शेगर यांची नाविन्यपूर्ण संकल्पना

**दिंडोरी ।** अवैध धंद्यामुळे कौटुंबिक व सामाजिक वातावरण दूषित होत असल्याची जाणीव ग्रामीण भागातील महिलांना असते. त्यातूनच सुरू होतो अवैध धंदे बंद करण्याचा संघर्ष! विशेषतः अवैध दारू विक्रेत्यांकडून महिलांना होत असलेला त्रास हा नित्याचा झाला. संबंधितांवर कारवाई व्हावी यासाठी महिला पोलीस स्टेशनचा रस्ता धरतांना अनेकदा बघितले; परंतु यावर पर्याय म्हणून त्या महिलांचीच दारूबंदी समिती स्थापन करत दारू विक्रेत्यांवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी देत दिंडोरीचे पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या महिलांना पोलीस स्टेशनच्यावतीने ओळखपत्र देत अवैध दारू विक्रत्यांवर अंकुश ठेवण्याची कामगिरी दिली आणि त्यात ते यशस्वी देखील झाले. महिलांनीदेखील याबाबत आनंद व्यक्त केला आहे.

दिंडोरीचे पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे दिंडोरी तालुक्यातील वणी खुर्द येथील महिला गावातील अवैध दारू विक्री बंद व्हावी व संबंधितांवर कारवाई व्हावी यासाठी वारंवार दिंडोरी पोलीस स्टेशनला आपला मोर्चा वळवत होत्या. वारंवार संबंधितांवर कारवाई करून देखील यावर आवश्यक तो परिणाम होत नव्हता. संबंधित दारू विक्रेत्यांकडून सदर महिलांना दमदाटी करणे, शिविगाळ करणे असे प्रकार वाढल्याने महिलांची सुरक्षा देखील ऐरणीवर आलेली होती. यावर

> दिंडोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील फोफळवाडे, विळवंडी, कोचरगाव, नाळेगाव या गावांमधील महिलांनी एकत्र येत दारूबंदी समिती स्थापन केली. त्यांना पोलीस स्टेशनच्या मार्फत ओळखपत्र देखील देण्यात आले. तसेच त्यांना योग्य ते कायदेशीर मार्गदर्शन देखील करण्यात आले आहे. इतरही गावातील महिलांनी एकत्र येऊन आमच्याशी संपर्क साधल्यास नक्कीच इतर गावांमध्ये देखील समिती स्थापन करण्यात येईल. यासाठी कायदेशीर संरक्षण आम्ही आमच्या वतीने देवू. – **रघुनाथ शेगर, पोलीस निरीक्षक, दिंडोरी**



दिंडोरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शेगर यांनी एक संकल्पना राबवत वणी खुर्द येथील महिलांची दारूबंदी समिती स्थापन केली . फक्त समिती स्थापन न करता त्या महिलांना दिंडोरी पोलीस स्टेशनच्या वतीने ओळखपत्र देखील देण्यात आले. त्यामुळे त्या महिलांना कायदेशीर बळ मिळून अवैध दारू विक्रेत्याविरोधात आवाज उठवण्यासाठी एक ताकद मिळवून दिली. त्यामुळे त्या महिलांनी निसंकोचपणे अवैध धंद्यांवर आक्रमक पवित्रा घेत त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे त्याचा परिणाम गावातील दारू विक्रेत्यांवर अंकुश ठेवण्यासाठी झाला असून पुन्हा एकदा गावात शांतता नांदत आहे. यासाठी शेगर यांनी केलेला हा उपाय अतिशय परिणामकारक व आदर्शवत ठरत आहे. फक्त तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात जर अशी संकल्पना राबवत अवैध धंद्याविरोधात एल्गार करण्यासाठी महिलांना कायदेशीर उभारी दिली तर नक्कीच अवैध दारू विक्रेत्यांवर अंकुश ठेवता येईल आणि या धंद्यांचा समूळ नायनाट देखील होईल. शेगर यांनी तालुक्यातील फोफळवाडे, विळवंडी , कोचरगाव, नाळेगाव या गावात देखील यशस्वी संकल्पना राबविली असून, इतर गावातदेखील ही संकल्पना राबवत एक महाराष्ट्रामध्ये आदर्श निर्माण करतील असा विश्वास वाटतो. शेगर यांच्या या संकल्पनेची सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# जगन्नाथ रथोत्सव यात्रेने दुमदुमली नाशिक नगरी












**नाशिक ।** भारत वर्षात सुप्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र जगन्नाथपुरी येथील प्राचीन रथोत्सवाच्या धर्तीवर नाशिक नगरी आयोजित भगवान श्री जगन्नाथजी, श्री सुभद्राजी, बलभद्रजी यांच्या रथयात्रेत अवघे भाविक भक्तिरसात चिंब झाले.

पंचवटीतील पंचमुखी हनुमान मंदिराचे महंत भक्तिचरणदासजी महाराज यांच्या संकल्पनेतून भगवान श्री जगन्नाथजी यांच्या रथयात्रेची मुहूर्तमेढ झाली. रथयात्रेचे हे तिसरे वर्ष होते. श्री जगन्नाथ पुरी रथयात्रा उत्सव समितीच्या माध्यमातून हा रथोत्सव संपन्न झाला. रथयात्रेच्या पूर्वसंध्येला (दि. २६) सकाळी १० ते १२ वाजेच्या दरम्यान पंचवटीतील तपोवन येथील आठवण लॉन्स येथे असलेल्या रथाचे पूजन आणि प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर शुक्रवारी (दि. २७) सकाळी रथ पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात% आणण्यात आला. भल्या सकाळी ६.३० भगवान श्री जगन्नाथजी यांचा अभिषेक, पूजन, तुलसी

## जगन्नाथ के भात । जगत पसारे हात ।

अर्चन आणि खिचडी प्रसाद कार्यक्रम झाला. सकाळी ९ वाजता भगवान श्री जगन्नाथजी, श्री सुभद्राजी, श्री- बलभद्रजी यांच्या मूर्त्या रथात विराजमान करण्यात आल्या. साधुसंत आणि मान्यवरांच्या हस्ते देवतापूजन करून महाआरती करण्यात आली. वाद्यांचा गजर, शंखनाद, भगवान श्री जगन्नाथजी यांच्या जयघोषात सकाळी ११ वाजता रथयात्रा निघाली. यावेळी शाहू महाराजांचे वंशज मुधोजी महाराज यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून राथयात्रेला सुरुवात करण्यात आली. तत्पूर्वी त्यांनी रथाच्या पुढे परंपरेनुसार झाडू मारत मार्ग स्वच्छ केला.

रथाच्या पुढे हनुमान धर्म ध्वज (निशान) होते. त्यानंतर जगन्नाथपुरीचे पारंपरिक वाद्य घडियाल, घंटा आणि मृदुंग यांचे पथक होते. त्यानंतर वेदघोष करणारे बटुकांचे पथक होते. शंखनाद करणारे पथक, देवदेवतांच्या वेशभूषा केलेले तथा प्राकृतिक दर्शन घडविणारे पथक, डमरूवादक पथक, मर्दानी खेळ करणारे खेळाडू होते. याशिवाय बँड बाजा, ढोलपथक होते. मिरवणुकीत शेकडो भाविक भगवे ध्वज, शिंग, धर्मध्वज, भगव्या पताका घेऊन सहभागी झाले होते. रथाच्या मागे साधूसंत विराजमान झालेले वाहन आणि भाविक चालत होते. रथाच्या दोन्ही बाजूंनी भाविक रथ ओढत होते. एक बाजूने पुरुष तर दुसऱ्या बाजूने महिला रथ ओढत होत्या. रथाचा वेग कमी करण्यासाठी तथा थांबविण्यासाठी पाठीमागून महिला व पुरुष नाड्याने ओढत होते. शहरातील प्रमुख मार्गावरून रथ मिरवणुकीने नेण्यात आला. हजारोंच्या संख्येने



भाविक रथयात्रेत सहभागी झाले होते. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी रथाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. महंत भक्तिचरणदासजी महाराज भाविकांना मार्गदर्शन करीत होते. भाविकांना स्वयंसेवक प्रसाद वाटत होते. पोलीस प्रशासनाने



चोख बंदोबस्त ठेवत वाहतुकीचे नियोजन केल्याने वाहतुकीची कोंडी झाली नाही. रथयात्रेत कैलास मठाचे महंत संविदानंदजी सरस्वती महाराज, जंगलीदासजी महाराज, राजारामजी महाराज, नाशिक येथील अनेक संत-महंत, महाराज यांच्यासह आमदार पंकज भुजबळ, माजी महापौर सतीश कुलकर्णी, विनायक पांडे, दशरथ पाटील, धनंजय बेळे, माजी आमदार वसंत गिते, सुनील बागूल, गणेश गिते, माजी नगरसेवक राजेंद्र महाले, हिंफु एकता आंदोल पक्षाचे रामसिंग



बावरी, विलास पांगारकर आदी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी मिरवणूक समारोपानंतर पंचमुखी हनुमान मंदिर येथे येऊन रथाचे दर्शन घेतले. रथयात्रा समारोपानंतरही सायंकाळपर्यंत रथ भाविकांना दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. त्यानंतर देवतांच्या मूर्त्या मंदिरात नेण्यात आल्या. हनुमान मंदिरात भविकांसाठी मसाले भात आणि बुंदीचा महाप्रसाद ठेवण्यात आला होता. हजारो भाविकांनी त्याचा लाभ घेतला.




## पिंपळगाव विद्यालयात शाहू महाराजांना अभिवादन

**देवळा ।** मविप्रच्या पिंपळगाव (वाखारी) येथील जनता विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अशोक बोरसे होते. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमचे पूजन करण्यात आले. उपशिक्षिका शितल देवरे यांनी शाहू महाराज यांचा जन्म, बालपण, अस्पृश्यता निवारण, स्त्रियांचा उद्धार, बहुजनांच्या मुलांसाठी शाळा व सामाजिक कार्याविषयी माहिती सांगितली. प्राचार्य बोरसे यांनी समता शिक्षण आणि न्यायाचे महान पुरस्कर्ते असे संबोधल्या जाणाऱ्या या महाराजांनी मोफत सक्तीचे शिक्षण तसेच अस्पृश्यता व जातीभेद नष्ट केले. बालविवाह प्रथा बंद केल्या. शेतक ऱ्यांसाठी शेती विषयक चांगले धोरण राबवले. त्यांनी विधवा पुनर्विवाहास मान्यता दिली. तसेच त्यांच्या सामाजिक कार्याबाबत माहिती सांगितली. सूत्रसंचलन पवन निकम यांनी केले. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षिका, व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## नरेडको नाशिकची सर्वसाधारण सभा, 'होमथॉन 3.0' प्रॉपर्टी एक्स्पोचे अनावरण

नाशिक | येथील नामांकित रिअल इस्टेट संघटना नरेडको नाशिक यांची सर्वसाधारण सभा दि. २६ जून २०२५ रोजी उत्साहात पार पडली. या सभेच्या निमित्ताने "होमथॉन 3.0 प्रॉपर्टी एक्स्पो" या भव्य उपक्रमाचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या कार्यक्रमास नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्यासह अतिरिक्त आयुक्त (कुंभमेळा) करिश्मा नायर, पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, चंद्रकांत खंडवी हे मान्यवर उपस्थित होते. सभेमध्ये नरेडकोचे सर्व सदस्य, नाशिकमधील विविध आर्किटेक्ट, चार्टर्ड अकाउंटंट्स आणि शहरातील प्रमुख संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. नरेडको नाशिकचे अध्यक्ष सुनील गवादे यांनी आपल्या भाषणात कुंभमेळा २०२६-२७ दरम्यान नाशिकमध्ये येणाऱ्या भाविकांसाठी नरेडको सदस्यांकडे असलेले फ्लॅट्स आणि ओपन प्लॉट्स पार्किंग व निवासासाठी




उपलब्ध करून देण्यात येतील असे आश्वस्त केले. यासोबतच पोलिस कर्मचारी, आरोग्य कर्मचारी यांची निवास व्यवस्था देखील करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, कुंभमेळा हा डिजिटल स्वरूपात पार पडावा यासाठी महत्त्वाच्या रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्याची नरेडकोची भूमिका आहे. आयुक्त मनीषा खत्री यांनी नरेडको नाशिकच्या उपक्रमांचे कौतुक करताना सांगितले की, शहराच्या नियोजनबद्ध विकासात नरेडको महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांनी कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी सर्व संस्थांचे व नागरिकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असल्याचे सांगून रिंगरोड, साधुग्राम व पायाभूत सुविधा सुसज्ज करण्याचा संकल्प व्यक्त केला. सभेदरम्यान "होमथॉन 3.0 प्रॉपर्टी एक्स्पो" या डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या भव्य प्रदर्शनाची औपचारिक घोषणा करण्यात आली. यावेळी ३०० पेक्षा अधिक बांधकाम प्रकल्पांची माहिती नागरिकांसाठी एकाच छताखाली उपलब्ध होईल, असे सांगण्यात आले.

अध्यक्ष सुनील गवादे यांनी नमूद केले की, "होमथॉन 3.0 केवळ एक प्रॉपर्टी प्रदर्शन नसून नाशिकच्या विकासाचा आराखडाच आहे." या प्रसंगी शहरातील पायाभूत सुविधांचा विकास, शाश्वत नागरीकरण आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील भविष्यातील दिशा यावर विचारमंथन झाले. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी नरेडको नाशिकचे पदाधिकारी, नेक्स्टजन सदस्य आणि कार्यकारी मंडळाने विशेष मेहनत घेतली. या सभेचे प्रायोजक टेक एलेवेटर, नाशिकचे अंशुमन अकुला आणि श्रद्धा अकुला होते, ज्यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रसन्ना सायखेडकर यांनी तर आभार प्रदर्शन अभय नेरकर यांनी केले.

## महत्त्वाचे

### मोकाट जनावरे सोडणाऱ्यांवर कारवाई करणार : संदीप चौधरी

**दिंडोरी ।** कळवण शहरातील ओतुर रस्त्यावर मोकाट जनावरांच्या हल्यात एक वृद्ध ठार झाला तर एक जण गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली या घटनेनंतर जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायती ॲक्शन मोडवर आल्या असून



नगरपंचायत हद्दीत फिरणाऱ्या मोकाट जनावरांच्या मालकांवरच आता कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा नगरपंचायतींनी दिला आहे,त्याच पार्श्वभूमीवर दिंडोरी शहर व हद्दीत मोकाट जनावरे सोडल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिंडोरी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संदीप चौधरी यांनी कर्मचाऱ्यांना दिले आहे,

नगरपंचायतीत मोकाट जनावरे सोडणाऱ्या नागरिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी संदीप चौधरी म्हणाले की शहर व परिसरात दिवसेंदिवस मोकाट व भटक्या जनावरांची संख्या वाढत आहे, शहरातील बाजार पटांगण, जुना कळवण रोड, उमराळे चौफुली, आदी परिसरात मोकाट जनावरांची संख्या वाढली आहे, यापुढे भटकी जनावरे रस्त्यावर दिसल्यास त्यांच्या मालकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, नागरिकांनी आपल्या जनावरांमुळे कोणालाही त्रास होणार नाही, कोणाचेही नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन मुख्याधिकारी संदिप चौधरी यांनी केले, यावेळी प्रशासकीय अधिकारी विजय देवरे, स्वच्छता निरीक्षक महेंद्र कांदळकर, पल्लवी धिवंदे यांनीही मार्गदर्शन केले, यावेळी शहरातील ग्रामस्थ उपस्थित होते,

## सातूर्ली फाट्याजवळ अर्भक सापडले; नरबळीचा संशय



**नाशिक ।** घोटी पोलिस स्टेशनच्या हद्दीत सातूर्ली फाटा येथे एका अर्भकाचा संशयास्पदरीत्या सापडलेला प्रकार समोर आला आहे.

शुक्रवारी सकाळी अवळी ग्रामपंचायतीचे सदस्य काळू वाघ आपल्या मुलांना शाळेत घेऊन जात असताना रस्त्याच्या कडेला बाळाच्या रडण्याचा आवाज त्यांनी ऐकला. तत्काळ त्यांनी

### एल्गार कष्टकरी संघटनेची चौकशीची मागणी

गाडी थांबवत परिसरात पाहणी केली असता त्यांना रस्त्याच्या कडेला स्त्री जातीचे अर्भक सापडले.

ही माहिती त्यांनी तात्काळ पोलिस पाटील पंडित गोविंद भगत यांना दिली. त्यांनीही क्षणाचाही विलंब न करता घोटी पोलीस ठाण्यात संपर्क साधून घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अर्भकाला संरक्षणात घेतले आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, यापूर्वीही अशा घटना या भागात घडल्याचे लक्षात घेता, सदर प्रकरण हे नरबळीच्या उद्देशाने केले गेले असावे, असा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी एल्गार कष्टकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.


संघटनेचे म्हणणे आहे की, "नर्मदा घाट परिसरात याआधीही अशा स्वरूपाचे प्रकार घडले असून ही बाब गंभीर असून पोलिसांनी याकडे गांभीर्याने पाहावे." सदर प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरु आहे.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिन्नर शाखेतील कर्मचाऱ्यांची मनमानी सुरूच

**सिन्नर ।** येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिन्नर शाखेतील कर्मचाऱ्यांची मनमानी काही संपायचे नाव घेत नाही. दैनिक 'महासागर'मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीमुळे प्रसाशकीय यंत्रणा जागी झाली असली, तरी किती दिवस कार्यक्षम कारभार चालेल याकडे ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

सभासद व ठेवीदारांना येथील कर्मचारी व शाखा व्यवस्थापक जयश्री सोनवणे यांच्याकडून नेहमी समझोता व उत्तम कामगिरी देण्यासाठी प्रयत्न असतो. कालच्या बातमीत त्यांचे नाव संबंधितांकडून गैरसमजातुन देण्यात आले होते. परंतु काही गोष्टी त्यांच्यापर्यंत गेल्या नसून, इतर कर्मचाऱ्यांकडून हेतूपुरस्सर त्यांनाच त्रास देण्यात येत असल्याचे समजते. व्यवस्थापक म्हणून जयश्री सोनवणे यांनाच टार्गेट केले गेले आहे. त्यांच्याकडून सर्व सभासद आणि ग्राहकांना नेहमी मदत होत असते. यापुढेही आपण सदैव मदत करू असे आश्वासन त्यांनी 'महासागर'शी बोलतांना दिले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिन्नर




शाखेमध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवेदारांकडून ठेवीची मुदत संपल्यानंतर सदर ठेव पावती ही नूतनीकरण करण्याची पद्धत सर्वच बँका व सहकारी पतसंस्था करत असतात. कोणतीही ठेव नूतनीकरण करणे ही त्या बँकेतील कर्मचा-यांची जबाबदारी असते. त्यासाठी व्यवस्थापकांपर्यंत जाण्याची गरज नसते. परंतु कर्मचा-यांच्या गलथानपणामुळे जिल्हा बँकेची बदनामी होत असते. सभासदांना त्याचा किती त्रास होतो, याचा विचार होणे गरजेचे आहे, असेही सांगण्यात आले.

